# हवामानावर आधारीत कृषि सल्ला (रायगड जिल्हा)

**(ग्रामीण कृषि मौसम सेवा, डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली आणि प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने)**

**(०२३५८) २८२३८७**

**अंक ५९/२०२०** **दिनांक २४/०७/२०२०** **कालावधी ५ दिवस**


**डॉ. प्रशांत बोडके,**
विभाग प्रमुख,
कृषिविदया विभाग
९४२०४१३२५५

**डॉ. विजय मोरे,**
नोडल ऑफिसर,
कृषिविदया विभाग
९४२२३७४००१


| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक १८/०७/२०२० ते २४/०७/२०२०) | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक २५/०७/२०२० सकाळी ८:३० पासून २९/०७/२०२० सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १८/०७ | १९/०७ | २०/०७ | २१/०७ | २२/०७ | २३/०७ | २४/०७ | | २५/०७ | २६/०७ | २७/०७ | २८/०७ | २९/०७ |
| २९.२ | २९.४ | ४.७ | २.२ | ०.० | १.२ | २.० | पाऊस (मिमी) | १९ | १७ | १६ | २८ | २६ |
| - | - | - | - | - | - | - | कमाल तापमान (अं.से) | ३२ | ३३ | ३० | ३३ | ३२ |
| - | - | - | - | - | - | - | किमान तापमान (अं.से) | २५ | २५ | २५ | २५ | २६ |
| - | - | - | - | - | - | - | मेघाच्छादन (ऑक्टा) | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ |
| - | - | - | - | - | - | - | सकाळची सापेक्ष आर्द्रता | ९० | ८८ | ९१ | ९० | ९० |
| - | - | - | - | - | - | - | दुपारची सापेक्ष आर्द्रता | ७५ | ६४ | ७५ | ६९ | ७६ |
| - | - | - | - | - | - | - | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | ३ | ६ | ७ | ११ | ५ |
| - | - | - | - | - | - | - | वाऱ्याची दिशा | आ. | द. | आ.द. | नै. | नै.द. |

| पाऊस (मिमी) मागील आठवडयातील | पाऊस (मिमी) १/१/२०२० पासून आजपर्यंत | पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा |
|---|---|---|
| ६८.७ | १००३.९ | ५१९७.२ |

**हवामान सारांश/ ईशारा**

**प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांच्याकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार रायगड जिल्ह्यात दिनांक २५ ते २९ जुलै, २०२० दरम्यान बहुतेक ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पाऊसाची शक्यता आहे.**

**ईशारा: जिल्ह्यातील तुरळक ठिकाणी दिनांक २४ ते २६ जुलै, २०२० दरम्यान जोरदार पाऊस पडण्याची शक्यता आहे.**

| पिक | अवस्था | हवामान अंदाजावर आधारित कृषि सल्ला |
|---|---|---|
| सामान्य सल्ला | - | • भाजीपाला लागवड क्षेत्रात गरजेनुसार बेणणी करावी. |
| खरीप भात | वाढीची अवस्था | • पुढील पाच दिवस हलक्या ते मध्यम पाऊसाची शक्यता लक्षात भात खाचरात पाण्याची पातळी २.५ ते ५.० सें.मी. पर्यंत नियंत्रित करावी.<br>• हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पाऊसाची शक्यता लक्षात घेता भात पुर्नलागवडीची कामे पूर्ण करून घ्यावीत.<br>• भात लागवड क्षेत्रात तणांची बेणणी करून पाऊसाची तीव्रता कमी असताना नत्र खताचा दुसरा हप्ता एकरी ३५ किलो युरिया या प्रमाणात पुर्नलागवडीनंतर ३० दिवसांनी देण्यात यावा.<br>• भात खाचरातील बांध तणमुक्त ठेवावेत जेणेकरून किडींच्या खाद्य वनस्पतीचा समूळ नायनाट केल्याने भात पिकावर किडींचा प्रादुर्भावावर आळा घालण्यास मदत होईल.<br>• पाणथळ भागातील भात पिकावर खाचरात पाणी साठून राहिल्यामुळे निळे भुंगेरेचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असल्याने पिकाचे किडीच्या प्रादुर्भावाकडे सातत्याने निरीक्षण करावे. निळे भुंगेरे किडीची अळी आणि प्रौढ अवस्था या दोन्ही हानिकारक आहेत. प्रौढ भुंगेरे पानाच्या वरच्या पृष्ठभागावरील हरितद्रव्य खातात व अळ्या पानाची सुरळी करून आतील हरीतभाग खातात परिणामी पानांवर पांढरे पट्टे दिसून येतात. या किडीचा प्रादुर्भाव फुटव्याच्या अवस्थेत व भात पसवण्यापुर्वी दिसून येतो. निळे भुंगेरेचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास नियंत्रणासाठी क्विनोलफॉस २५ टक्के प्रवाही २० मि.ली. किंवा ट्रायझोफॉस ४० टक्के प्रवाही १२.५ मि.ली. किंवा लॅम्बडा सायहॅलोथ्रीन ५ टक्के प्रवाही ५ मि.ली. प्रति १० लिटर पाण्यातून फवारावे.<br>• पाऊसाची उघडझाप आणि ढगाळ वातावरणामुळे पुर्नलागवड करून १० ते १५ दिवस झालेल्या भात पिकावर खोडकिडीचा प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता असल्याने पिकाचे निरीक्षण करावे. एक चौरस मीटर क्षेत्रात किडीचा एक अंडीपुंज आढळून आल्यास किडीच्या नियंत्रणासाठी कारटॅप हायड्रोक्लोराईड ४ टक्के दाणेदार ७.५ कि.ग्रॅ. किंवा क्लोरॅनट्रोनीलीपोल ०.४ टक्के दाणेदार ४ कि.ग्रॅ. किंवा फिप्रोनील ०.३ टक्के दाणेदार ८.३ कि.ग्रॅ. प्रति एकर या प्रमाणात जमिनीत पूरेसा ओलावा असताना देण्यात यावा. पाणथळ भागामध्ये पाण्याचा निचरा करून बांध बांधून घेवून दाणेदार कीटकनाशकांचा वापर करावा. किडींच्या नियंत्रणासाठी शेतामध्ये २०-२५ मीटर अंतरावर एक असे ८ गंध सापळे प्रति एकरी लावावेत. |
| नागली (नाचणी) | वाढीची अवस्था | • नागली पिकामध्ये पुर्नलागवडीनंतर दोन आठवड्यानी गरजेनुसार बेणणी करावी. |
| आंबा | वाढीची अवस्था | • हापूस आंब्यामध्ये वर्षाआड फळे धरण्याचा गुणधर्म १० वर्षानंतर प्रकर्षाने दिसून येतो. यासाठी पूर्ण वाढलेल्या (१० वर्षावरील) हापूस आंब्याला दरवर्षी नियमित फळे धरण्यासाठी झाडाच्या विस्ताराचा पूर्व-पश्चिम व दक्षिण-उत्तर व्यास मोजून त्याची सरासरी काढून विस्ताराच्या प्रति मीटर व्यासास ३ मि.ली. या प्रमाणात कल्टारची (पॅक्लोब्युट्राझोल) मात्रा पाऊसाची तीव्रता कमी असताना द्यावी. पॅक्लोब्युट्राझोलची आवश्यक मात्रा ३ ते ५ लिटर पाण्यात मिसळून झाडाच्या बुंध्याभोवती विस्ताराच्या |

| | | |
|---|---|---|
| | | निम्म्या अंतरावर १० ते १२ सें.मी. खोल असे सम अंतरावर २५ ते ३० खड्डे मारून समप्रमाणात ओतावे, नंतर खड्डे मातीने बुजवून टाकावे. पॅक्लोब्युट्राझोल देण्यापूर्वी झाडाभोवती असलेले तण काढून टाकावे. |
| **वांगी** | **फुलोरा अवस्था** | • वांगी पिकावर शेंडा आणि फळे पोखरणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता असल्याने प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी इमामेक्टीन बेन्झोएट ५% एस.जी. ४ ग्रॅम किंवा अझाडीराक्टीन १ टक्का २० मि.ली. किंवा लॅम्बडा सायहॅलोथ्रीन ५ टक्के प्रवाही ६ मि.ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून पाऊसाची तीव्रता कमी असताना फवारणी करावी. |
| **मिरची** | **वाढीची अवस्था** | • मिरची पिकावर चुरडा मुरडा रोगाचा प्रादुर्भाव फुलकिडे, पांढरी माशी आणि कोळी किटकामुळे दिसून येण्याची शक्यता असते. किडे पानातील रस शोषून घेतात. त्यामुळे पाने सुरकुततात व पानांची वाढ खुंटते. किडींचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास नियंत्रणासाठी डायमेथोएट ३० टक्के प्रवाही १ मि.ली. + गंधक २ ग्रॅम प्रति लिटर पाण्यात मिसळून १० ते १५ दिवसांच्या अंतराने फवारणी पाऊसाची तीव्रता कमी असताना करावी. तसेच फुलकिडीच्या नियंत्रणासाठी गोमूत्र १० टक्के आणि ॲझॉडीरिक्टीन १०००० पी.पी.एम ३ मि.ली. प्रति लिटर पाण्यातून आलटून पालटून लागवडीनंतर १५ दिवसांपासून सात दिवसांच्या अंतराने पाऊसाची तीव्रता कमी असताना फवारण्या कराव्यात. पिकामध्ये निळ्या रंगाचे चिकट कागद (ब्लू ट्रेप) सापळे वापरावेत. |
| **वेलवर्गीय भाजीपाला** | **फुलोरा अवस्था** | • वेलवर्गीय भाजीपाला पिकामध्ये फुले येण्यास सुरुवात झाली असल्यास फळमाशीच्या नियंत्रणासाठी 'मिथाईल युजेनोल' किंवा 'क्यु-लुअर' रक्षक सापळे भाजीपाला क्षेत्रामध्ये जमिनीपासून १ ते २ फूट उंचीवर २५ गुंठे क्षेत्रामागे एक या प्रमाणात लावावेत.<br>• काकडी, पडवळ, दुधीभोपळा, तांबडा भोपळा, दोडका, कारली इ. वेलवर्गीय पिकांवर ढगाळ वातावरणामुळे भुरी रोगाचा प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता आहे. रोगामुळे पानांवर दोन्ही बाजूनी पांढऱ्या भुकटीच्या स्वरूपातील बुरशीची वाढ दिसून येते. रोगाचा प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी कार्बेन्डेझीम ५ ग्रॅम किंवा झायनेब २० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून पाऊसाची तीव्रता कमी असताना फवारणी करावी. |

**टिप: पाऊसाची तीव्रता कमी असताना खते द्यावीत तसेच कीटकनाशकाच्या व बुरशीनाशकाच्या फवारण्या कराव्यात. पाऊसात द्रावण पानांवर चिकटून राहण्यासाठी फवारणीच्या द्रावणात स्टिकर मिसळून फवारणी करावी.**

**सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीनुसार तयार करून प्रसारित करण्यात आली.**

**अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा**